<u>वाहन चालकांचे अतिकालीक भत्याबाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**

वित्त विभाग

**शासन परिपत्रक क्र. अतिका-२०१२/प्र.क्र.१८२/ अर्थसंकल्प-२**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : १८ जानेवारी, २०१३.

वाचा :-

१) शासन पत्र क्र. व्हीजीटी-१००७/प्र.क्र.१५६२/अर्थसंकल्प-२, दि. ५.१२.२००९.

२) शासन परिपत्रक क्र. अतिका-२०११/प्र.क्र.१७५/अर्थसंकल्प-३, दि. २.११.२०११.

**<u>परिपत्रक</u>**

केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या उद्दिष्टशीर्षाच्या सांकेतांकाच्या लेखांकन प्रणालीमध्ये समानता व सुसुत्रता आणण्यासाठी एकूण ६७ उद्दिष्टशीर्षात बदल करुन तो दि. १.४.२००६ पासून लागू करण्याचा निर्णय शासनाने दि. १ जुलै, २००६ च्या परिपत्रकान्वये घेतला आहे. त्यानुसार "०३ अतिकालीक भत्ता" हे उद्दिष्टशीर्ष उघडून त्यामध्ये वाहन चालकांच्या अतिकालीक भत्यासाठी तरतूद करणे अपेक्षित आहे. तथापि, खूपच कमी मंत्रालयीन विभागांनी "०३ अतिकालीक भत्ता" हे उद्दिष्टशीर्ष उघडून त्याखाली पुरेशी तरतूद करण्यात येते, असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे निधी अभावी अतिकालीक भत्त्यांची देयके प्रलंबित राहत असून त्याबाबत वाहन चालकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होत असल्याच्या तक्रारी वाहन चालकांच्या मान्यता प्राप्त संघटनेकडून प्राप्त होत आहेत.

२. या संदर्भात सर्व मंत्रालयीन विभागांना पुन्हा कळविण्यात येते की, त्यांनी सन २०१२-१३ च्या सुधारीत अंदाजामध्ये "०३ अतिकालीक भत्ता" या उद्दिष्टशीर्षाखाली पुरेशी तरतूद उपलब्ध करुन घ्यावी किंवा अन्य उद्दिष्टांखालील तरतूदीतून पुनर्वितरणाने निधी उपलब्ध करुन घ्यावा व अतिकालीक भत्याची देयके प्रलंबित राहणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी. तसेच सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात वाहन चालकांच्या पदांच्या योग्य त्या माहितीसह "०३ अतिकालीक भत्ता" या उद्दिष्टशीर्षाखाली पुरेशी तरतूद उपलब्ध करुन घेण्याबाबत देखील दक्षता घ्यावी.

**( अ.ना. भोसले )**

**शासनाचे उप सचिव, वित्त विभाग**

प्रति,

सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
कार्यासन प्रशासन-४, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, अर्थसंकल्प-३.